खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा

पुढारी

# खेड शिक्षण प्रसारकची वार्षिक सभा

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि. २९) संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या प्रसंगी मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. सभासदांनी त्यास मंजुरी दिली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पातळीवर तयारी संदर्भात चर्चा झाली. संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने त्या संदर्भातील संभाव्य उपक्रमांना मंजुरी दिली. संस्थेस बाधा आणणाऱ्या राजेश राम कांडगे यांच्यासह ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. चर्चेत अनिल राक्षे, किसन दिवे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदींनी सहभाग घेतला. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारुती बारणे, सदाशिव कोहिनकर यांचा विशेष सन्मान केला. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी सहकार्य केले.



सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

My Gramin Edition
Sep 30, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वार्षिक सभेत निर्णय

**राजगुरुनगर, दि. २९ (प्रतिनिधी) -** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८वी वार्षिक सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली (दि. २९) झाली. या सभेत संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्दकरण्याचा महत्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आला

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाच्या पातळीवरती करण्यात येणाऱ्या तयारी संदर्भात चर्चा करण्यात आली. पुढील वर्षापासून संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या संभाव्य उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, किसन दिघे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदि सभासदांनी सहभाग घेतला. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. संस्थेने नवीन सुरू केलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयासाठी राजगुरूनगरपासून जवळपास असलेली महामार्गानजीक जागा शोधण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संस्थेचे ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारूती बारणे, सदाशिव कोहिनकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले.

लोकमत

वार्षिक सभेत एकमुखी निर्णय : शैक्षणिक धोरणावर चर्चा

# खेड शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४९ सभासदांचे सदस्यत्व रद्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८ वी वार्षिक सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली (दि. २९ रोजी) संपन्न झाली. संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या राजेश राम कांडगे यांच्यासह ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सभासदांनी एकमुखाने घेतला.

संस्थेच्या वार्षिक सभा होऊ नयेत म्हणून अनेकांनी जाहिरातबाजी करून खोडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, सभासदांनी कुठल्याही भूलथापांना बळी न पडता मोठ्या प्रमाणात सभेसाठी गर्दी केली होती. अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाच्या पातळीवरती करण्यात येणाऱ्या तयारीसंदर्भात चर्चा करण्यात आली. संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या राजेश राम कांडगे यांच्यासह ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सभासदांनी एकमताने घेतला. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, किसन दिघे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदी सभासदांनी सहभाग घेतला. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. संस्थेने नवीन सुरू केलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयासाठी राजगुरूनगरपासून जवळपास असलेली महामार्गनजीक जागा शोधण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारुती बारणे, सदाशिव कोहिनकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी कामकाज पार पाडले.

Hello Pune Gramin
Page No. 1 Sep 30, 2022
Powered by: erelego.com

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सभा खेळीमेळीत

## संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या ४९ सभासदांचे सदस्यत्व रद्द




**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८ वी वार्षिक सभा संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी २९ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. याप्रसंगी मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाच्या पातळीवरती करण्यात येणाऱ्या तयारी संदर्भात चर्चा करण्यात आली. ₹

पुढील वर्षापासून संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या संभाव्य उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली. संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या राजेश राम कांडगे यांच्यासह ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सभासदांनी एकमताने घेतला. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, किसन दिघे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदि सभासदांनी सहभाग घेतला.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. संस्थेने नवीन सुरू केलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयासाठी राजगुरुनगरपासून जवळपास असलेली महामार्गनजीक जागा शोधण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारुती बारणे, सदाशिव कोहिनकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक व स्वागत देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. आभार सहिरामण सातकर यांनी मानले.

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

## संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द



राजगुरूनगर (दै. संध्या) :

राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८ वी वार्षिक सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. २९) खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या प्रसंगी मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाच्या पातळीवरती करण्यात येणाऱ्या तयारी संदर्भात चर्चा करण्यात आली. पुढील वर्षापासून संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या संभाव्य उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली. संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या राजेश राम कांडगे यांच्यासह ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सभासदांनी एकमताने घेतला.

विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, किसन दिघे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदि सभासदांनी सहभाग घेतला. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. संस्थेने नवीन सुरू केलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयासाठी राजगुरूनगरपासून जवळपास असलेली महामार्गनजीक जागा शोधण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारुती वारणे, सदाशिव कोहिनकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले.

सभेचे प्रास्ताविक व स्वागत संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले तर उपस्थित सभासदांचे आभार संचालक हिरामण सातकर यांनी मानले.

HRM

सकाळ

# 'खेड शिक्षण प्रसारक'च्या ४९ जणांचे सभासदत्व रद्द

**राजगुरुनगर, ता. १ :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८वी वार्षिक सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झाली. त्यात संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या तब्बल ४९ सभासदांचे सभासदत्व रद्द केल्याचा ठराव केला.



**राजगुरुनगर (ता. खेड) : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वार्षिक सभेत बोलताना अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील.**

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली.केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी, महाविद्यालयाच्या पातळीवरती करण्यात येणाऱ्या तयारीसंदर्भात चर्चा केली. पुढील वर्षापासून संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या संभाव्य उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली. संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्याचा ठराव या वेळी सभासदांनी एकमताने संमत केला.

सभेच्या कामकाजात अनिल राक्षे, किसन दिघे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदी सभासदांनी सहभाग घेतला.बुट्टे पाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. संस्थेने नवीन सुरू केलेल्या साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयासाठी राजगुरूनगरपासून जवळपास, महामार्गानजीक जागा शोधण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारुती बारणे, सदाशिव कोहिनकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा विशेष सन्मान केला.संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

Pune, District-Today
02/10/2022 Page No. 5

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सभा खेळीमेळीत

राजगुरूनगर/किरण खुडे
: (स. गांवकरी)

- **संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द**



येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४८ वी वार्षिक सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. २९) खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या प्रसंगी मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या ४९ सभासदांचे सदस्यत्व यावेळी कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाच्या पातळीवरती करण्यात येणाऱ्या तयारी संदर्भात चर्चा करण्यात आली. पुढील वर्षापासून संस्था सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या संभाव्य उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली. संस्थेच्या हितास आणि नावलौकिकास बाधा आणणाऱ्या राजेश राम कांडगे यांच्यासह ४९ सभासदांचे सदस्यत्व कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सभासदांनी एकमताने घेतला.

विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत डॉ. अनिल खिवंसरा, अनिल राक्षे, किसन दिघे, शांताराम घुमटकर, कैलास सांडभोर, सतीश चांभारे, प्रकाश पाचारणे आदि सभासदांनी सहभाग घेतला.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती सभासदांना दिली. संस्थेने नवीन सुरू केलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयासाठी राजगुरूनगरपासून जवळपास असलेली महामार्गानजीक जागा शोधण्यासाठी संस्थेच्या सभासदांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे ज्येष्ठ सभासद बन्सीलाल कर्णावट, साहेबराव देशमुख, मारूती बारणे, सदाशिव कोहिनकर यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक कैलास पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. सभेचे प्रास्ताविक व स्वागत संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले तर उपस्थित सभासदांचे आभार संचालक हिरामण सातकर यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**